# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ५.

## <u>प्र क ट न</u>

क्रमांक-पु.वि.मं./शाखा-क/ 2010
पुणे ४११ ००५.
दि.२२.११.२०१७ 28

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक विद्यालय,
जिल्हा-पुणे/अहमदनगर/सोलापूर.

विषय- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१७
उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्र वाटप करण्याबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना या प्रकटनाव्दारे कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांची प्रमाणपत्र शुक्रवार दि.०८.१२.२०१७ रोजी मंडळाच्या निर्धारित केंद्रावर वाटप करण्यात येणार आहेत. तरी सर्व शाळा प्रतिनिधींनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१८ विद्यार्थी यादी व चलनाची प्रत (fee details) बरोबर मार्च २०१७ ची प्रमाणपत्र घेण्याकरिता अधिकार पत्रासह हजर रहावे. सदर प्रमाणपत्रामध्ये काही दुरुस्ती असल्यास त्यासंदर्भात खालील सूचनेनुसार त्यावर कार्यवाही करावी. कोणत्याही परिस्थितीत **<u>सदर कामासाठी शिपाई पाठविण्यात येवू नये.</u>** सर्व शाळांनी प्रमाणपत्र वितरण केंद्रावरुनच घेवून जावीत.

१. प्रमाणपत्र आपल्या माध्यमिक शाळांचीच असल्याची खात्री करुन घ्यावीत. जर प्रमाणपत्र कमी/जास्त असतील तर तात्काळ मंडळ प्रतिनिधी यांच्या निदर्शनास आणून त्यासंदर्भात लेखी पत्र देण्यात यावे. नंतर कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही.

२. उत्तीर्ण विद्यार्थी संख्या व प्रमाणपत्र संख्या बरोबर असल्याची खात्री करावी. ३. विद्यार्थ्यांचे नाव, बैठक क्रमांक, विषय, गुण इत्यादी माहिती आपल्या विद्यालयाचे रजिस्टरवरुन तपासून पहावी. त्यामध्ये काही दुरुस्ती असल्यास त्यासंदर्भात ३० दिवसाचे (एक महिन्याचे) आत या कार्यालयास जनरल रजिस्टरची साक्षांकित प्रत व मूळ गुणपत्रिकेसह व प्रत्येक विद्यार्थ्यास दुरुस्तीनुसार दंड रोख रक्कम अथवा चलनाने भरुन मंडळ कार्यालयात समक्ष सादर करावीत. एक महिन्यानंतर प्रमाणपत्रामध्ये कसलीही दुरुस्ती केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

३. **<u>पॅनल/शिक्षकांची माहिती (राहिली असेल तर,) दि.०८.१२.२०१७ रोजी वितरण केंद्रावर सादर करावी.</u>**

24/11/17

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.

माहितीसाठी- मा.शिक्षणाधिकारी, पुणे/अहमदनगर/सोलापूर
निर्धारित केंद्र- <u>पुणे</u>- मंडळ कार्यालय, बारामती, नारायणगावं
<u>अहमदनगर</u>- अहमदनगर, श्रीरामपूर,
<u>सोलापूर</u>- सोलापूर, पंढरपूर,

E:\NYG\PRAKATAN